असा. क्र. २७५ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, ऑक्टोबर ३१, २००३/कार्तिक ९, शके १९२५**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ ऑक्टोबर २००३

**आदेश**

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००३/७४२/प्र.क्र. ३१७/म-१.—ज्याअर्थी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे ) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, लोकहितास्तव तसे करणे आवश्यक आहे, अशी खात्री झाल्यामुळे, याद्वारे उक्त अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची-एक मधील अनुच्छेद ५ (ह) (संलेख करार), अनुच्छेद ५ (ग-अ) (विकास करार), अनुच्छेद ४७ (संयुक्त उपक्रम) अनुच्छेद ४८ (अ) ते (इ) (मुखत्यारनामा) आणि अनुच्छेद ४८ (ग) (विकास करण्यासाठी दिलेला मुखत्यारनामा ) या खालील ' खाजगी क्षेत्राच्या सहभागामार्फत औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाचा विकास ' या नावाच्या धोरणाखाली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व खाजगी विकासक यांच्यामध्ये निष्पादित करावयाच्या आकारणीयोग्य मुद्रांक शुल्कांना सूट देण्यात येत आहे.

**स्पष्टीकरण.**—या आदेशाच्या प्रयोजनार्थ, खाजगी विकासक याचा अर्थ, औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाचा विकास करण्याचे काम नेमून देण्यात आलेला आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने

नियुक्त केलेला सक्षम प्राधिकारी किंवा त्याने या संबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेली कोणतीही व्यक्ती, भागिदारी संस्था, संस्थापना, कंपनी किंवा संयुक्त उपक्रम असा असेल आणि त्यात त्याचा समावेश असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रमाकान्त अस्मर,**
शासनाचे सहसचिव.

REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 31st October 2003

Order

BOMBAY STAMP Am, 1958.

No. MUDRANK. 2003/742/C.R. 317/M-1.—In exercise of the powers conferred be Sub-clause (a) of section 9 of the Bombay Stamp Act, 1968 (Bom. LX of 1958), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary so to do in public interest, hereby remits the stamp duty chargeable undr Article 5 (h) (Instrument of agreement), Article 5(g-a) (development Agreement), Article 47 (Joint Venture Agreement.) Article 48 (a) to (e) (Power of Attorney) and Article 48 (g) (Power of Attorney given for development) in the Schedule-I appended to the said Act, to be executed between the Maharashtra Industrial Dwelopment Corporation and a private developer, under the policy known as Development of Industrial Parks through Private Sector Participation.

*Explanation.*—For the purpose of this order ' private developer ' shall mean and include any person, Firm, Institute, Company or Joint Venture Company who has been allotted the work of development of the Industrial Park and who has been certified by the Competent Authority or any Officer authorised by him in this behalf, appointed by the Maharashtra Industrial Dwelopment Corporation.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAMAKANT ASMAR,
Joint Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई